दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.२९ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४० | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 29 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 240 | Pages 4 | Rate 4 Rs

### महाराष्ट्रात राहायचे तर मराठी बोलता आलीच पाहिजे

**मुंबई**–ऑटो-टॅक्सी चालकांना थोडी फार तरी मराठी बोलता आली पाहिजे. आम्ही ते सुद्धा बोलणार नाही अशी कोणाची भावना असेल तर ती चुकीची आहे. १ मे पासून हा नियम लागू होणार होता, मात्र तो आता पुढे ढकलण्यात आला आहे. ८ ते १० वाक्य शिकायला २ दिवसांमध्ये कोणीही शिकू शकतो. महाराष्ट्रामध्ये राहत असताना मराठी भाषा शिकायला कोणाला अडचण असू नये. त्यांना काही मराठीमध्ये निबंध लिहायला लावणार नाही, ते मान्य केले तर हा प्रश्न सुटू शकतो, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी म्हटले आहे.अनिल देशमुख म्हणाले की, खताच्या किंमतीमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. २५ ते ४५ टक्क्यापर्यंत खताच्या किंमतीमध्ये वाढ झाली करण्यात आली आहे. २०-२०-० खताच्या किंमतीमध्ये २५ टक्के तर २४-२४-० खताच्या किंमतीमध्ये जवळपास २३ टक्के वाढ झाली आहे. एमओपीच्या किंमतीमध्ये मोठी वाढ झाली आहे, अशा पद्धतीने खताच्या किंमतीमध्ये वाढ झाली असून त्याकडे सरकारचे लक्ष नाही.

# मराठवाड्यात ३ महिन्यांत २१७ शेतकरी आत्महत्या

## सरकारला अजून किती बळी हवेत? काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा सवाल

### शेतकरी आत्महत्या थांबवण्यात सरकार अपयशी

विजय वडेट्टीवार सोशल मीडियातील आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, मराठवाड्यात अवघ्या तीन महिन्यांत २१७ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळलंय. कर्जाचा बोजा आणि उद्ध्वस्त झालेल्या पिकांमुळे बळीराजा हतबल झाला आहे. रक्ताचं पाणी करून जगाला पोसणारा अन्नदाता आज स्वत:च्याच शेतात फासावर लटकतोय, ही सर्वात मोठी शोकांतिका आहे.सरकारला अजून किती बळी हवेत? तुमच्या मदतीच्या घोषणा आणि योजना फक्त कागदावरच नाचत आहेत, पण शेतकऱ्याच्या घरापर्यंत पोहचायला यांना मुहूर्त मिळत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यात हे सरकार पूर्णपणे निकामी ठरलं आहे. अशा सरकारचा आम्ही जाहीर निषेध करतो, असे ते म्हणालेत.



**मुंबई । प्रतिनिधी**

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांवरून महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. मराठवाड्यात अवघ्या ३ महिन्यांत तब्बल २१७ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. या सरकारला आणखी किती बळी हवेत, असा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.मराठवाडा हा दुष्काळ, अवकाळी पाऊस, पिकांचे नुकसान, कर्जबाजारीपणा व हमीभावाच्या प्रश्नांनी ग्रासलेला प्रदेश म्हणून ओळखला जातो. या संकटांच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणींसह मानसिक तणावाचाही मोठा डोंगर उभा राहतो. आणि त्यातून अनेकदा आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जातात. शासनाकडून कर्जमाफी, मदतपॅकेज व विविध योजनांची घोषणा होते. पण प्रत्यक्षात त्याचा लाभ वेळेत व प्रभावीपणे पोहोचत नसल्याची खंत शेतकरी वर्गातून व्यक्त केली जाते. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर उपरोक्त टीका केली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी भाजप नेते विनोद तावडे यांनी राहुल गांधींवर केलेली टीका जोरकसपणे फेटाळून लावली होती. ज्यांना परकीय सत्तांसमोर लोटांगण घालण्याचा वारसा लाभला आहे, ते कोणत्या तोंडाने बोलतात? असा प्रश्न तावडेंनी राहुल गांधींच्या संघावरील टीकेला प्रत्युत्तर देताना उपस्थित केला होता. त्यावर वडेट्टीवार म्हणाले होते, स्वातंत्र्यलढ्यात ज्यांचा कुठेही सहभाग नव्हता, ज्यांची विचारसरणीच परकीय सत्तेसमोर नतमस्तक होण्यात वाढली, त्यांनी काँग्रेस आणि देशभक्तीवर प्रश्न उपस्थित करणं म्हणजे इतिहासाचाच अपमान आहे.देशासाठी तुरुंगवास भोगणाऱ्यांना, बलिदान देणाऱ्यांना आणि भारताच्या लोकशाहीची पायाभरणी करणाऱ्यांना आज उपदेश देण्याचा नैतिक अधिकार विनोदजी तुमच्या भाजप-आरएसएसकडे नाही. देशभक्ती ही तुमच्या प्रमाणपत्रावर चालत नाही आणि काँग्रेसचा १४० वर्षांचा त्याग, संघर्ष आणि राष्ट्रनिष्ठेचा इतिहास तुमच्या खोट्या प्रचाराने पुसला जाणार नाही. सत्तेसाठी देशाची प्रतिष्ठा गहाण ठेवणाऱ्यांनी आधी स्वतःचा इतिहास तपासावा, मग इतरांना राष्ट्रभक्ती शिकवावी, असे ते म्हणाले होते.



# गडकोट विकास महामंडळाच्या स्थापने साठी मंत्री आशिष शेलार यांची बैठक

## किसन पाटील यांचा लढा यशाच्या दिशेने

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



गेल्या पाच वर्षापासून जागर प्रतिष्ठान संघटना महाराष्ट्र भर गड किल्ले संवर्धनाचे काम करत आहे गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने गडकोट विकास महामंडळ स्थापन करावे हे मागणी गेल्या अनेक वर्षापासून जागर प्रतिष्ठान करत आहे वेळोवेळी संघटनेच्या वतीने महाराष्ट्रभर निवेदन आंदोलनात देण्यात आलेले आहेत मार्च महिन्यात तुळजापूर येथे जा प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांनी गडकोट विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी आमरण उपोषण केले होते त्याची दखल घेऊन मुंबई येथे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी महत्त्वपूर्ण बैठकीच्या आयोजन केले होते या बैठकीत त्यांनी गडपड विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगितले आणि संबंधित विभागांना एका महिन्यात अभ्यास पूर्ण आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या.उपोषणाच्या दरम्यान अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी दिलेल्या आश्वासनानुसार त्यांनी या बैठकीचे आयोजन केले होते या बैठकीला जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांच्या सह जागर प्रतिष्ठानचे शिष्टमंडळ उपस्थित होते त्यात विशाल जाधव, चंद्रशेखर कदम, आदिनाथ शिंदे, अशोक आगे, विठ्ठल ताटे, संगम चाळक,गोरख चव्हाण,महेश चव्हाण आदी. हे उपस्थित होते.

# पोलीस कस्टडीतील मृत्यू की खून? केज पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी तीव्र

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

केज पोलीस स्टेशन आधीच राज्यभर चर्चेत असताना आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे.केज तालुक्यातील तरुण आशिष धिवार यांचा पोलीस कस्टडीमध्ये झालेल्या कथित मारहाणीमुळे बीड जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला.या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून,हा मृत्यू नसून थेट खूनअसल्याचा आरोप होत आहे.

रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम वीर यांनी कठोर भूमिका घेत,केज पोलिसांवर तात्काळ खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी जोरदार मागणी केली आहे.हा साधा मृत्यू नाही तर पोलीस अत्याचाराचा परिणाम आहे.दोषींना वाचवण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.



दरम्यान,मयत आशिष धिवार यांच्या कुटुंबीयांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला असून,न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.आधी गुन्हा दाखल करा,मगच अंत्यसंस्कार अशी त्यांची ठाम भूमिका आहे.

**याशिवाय,कुटुंबातील एकासदस्याला शासकीय नोकरी देण्याची मागणी**

पोस्टमार्टम इन-कॅमेरा पद्धतीने,बाहेरील जिल्ह्यातील डॉक्टरांकडून करण्याची मागणीही पुढे करण्यात आली आहे.या घटनेची दखल घेत, रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर लवकरच केज येथे भेट देणार असल्याची माहिती आहे.दरम्यान,या प्रकरणामुळे केज पोलिसां विरोधात प्रचंड रोष निर्माण झाला असून,नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे आता प्रशासन या गंभीर आरोपांवर काय कारवाई करते,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अल्पवयीन परधर्मीय तरुणाने केले अल्पवयीन मुलीचे अपहरण,केज पोलिस ठाण्यात तक्रार दाखल




दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील एका गावातून एका अल्पवयीन मुलीला एका भिन्न धर्मीय अल्पवयीन तरूणाने अज्ञात कारणा साठी फूस लावून पळवून नेले आहे.गुरूवार दि.२३ एप्रिल रोजी पिडीत मुलीचे आई-वडील हे नातेवाईकांच्या कार्यक्रमा साठी नेकनुर येथे गेले होते.रात्री उशिरा आई - वडील घरी आल्यानंतर त्यांना त्यांची मुलगी घरी नसल्याचे निदर्शनास आल्या नंतर त्यांनी आपल्या नातेवाईकांकडे मुलीचा शोध घेतला.मात्र मुलगी कोणाकडेही आढळून आली नाही.

दरम्यान पिडीत मुलीच्या भावाच्या मोबाईलवर अंबाजोगाई तालुक्यातील एका गावच्या ग्रामपंचायत सदस्याने कळविले की,बेपत्ता असलेल्या तुमच्या मुलीला घेऊन,एक तरुण हा अंबाजोगाई तालुक्यातील त्याचे आजोळ आसलेल्या गावी गेला आहे.पिडीत मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरून त्यांच्या गावातील एका तरुणाने १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला गावातीलच १६ वर्षीय तरुणाने अज्ञात कारणासाठी फूस लावून पळवून नेल्या प्रकरणी केज पोलिसात त्या तरुणा विरुद्ध अपहरणाचा गून्हा केज पोलिसात नोंद झाला आहे.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम हे पुढील तपास करीत आहेत.

# विराळमध्ये जागृत महिला सक्षमीकरण शिबिर उत्साहात संपन्न ; महिलांना उद्योजकतेचे धडे

दैनिक वादळ वार्ता
**विराळ । प्रतिनिधी**

महापुरुषांच्या संयुक्त जयंती निमित्त विराळ येथे आयोजित करण्यात आलेले जागृत महिला सक्षमीकरण शिबिर उत्साहात आणि मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले. महिलांना स्वावलंबी आणि उद्योजक बनवण्या साठी आयोजित या शिबिरात मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला डॉ. तानाजी चंदावर,सौ. सुमिता कावळे मॅडम, सरपंच संतोष प्रभाकर पवार,ज्येष्ठ माजी चेअरमन रामराव एकलोरे,सीआरपी स्वाती तुळशीराम जाधव,माजी उपसरपंच पांडुरंग वाघमारे,शोभाताई गौतम भालेराव,आशाकार्यकर्ती शोभा शिवमुर्ती वाघमारे, रोजगार सेवक दत्ता गोविंद वाघमारे आणि समर्थ धोंडूतात्या कमिटी चे लक्ष्मण एकलोरे यांची प्रमुख उपस्थितीलाभली.

कार्यक्रमाचे मार्गदर्शक विशाल पाटील आणि प्रमुख वक्त्या उद्योजिका सुमिता कावळे यांनी महिलांशी संवाद साधताना सांगितले की, आजच्या काळात महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता स्वतःचा



व्यवसाय उभा करून आत्मनिर्भर व्हावे.आवळयापासून वीस पेक्षा अधिक वस्तू तयार करून त्याची विक्री कशा प्रकारे केली जाते याची माहिती दिली. डॉ.तानाजी चंदावर यांनी ही महिलांना स्वावलंबनाचा संदेश देत उद्योगाच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.यावेळी आदर्श शिक्षक मारुती घोटरे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले,तर सरपंच संतोष पवार यांनी गावात अशा महिलासक्षमीकरण उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल अमोल भालेराव,सूरज भालेराव, आयोजकांचे अभिनंदन केले.या प्रसंगी अमोल भालेराव यांनी म्हटले की,गावातील महिलांना, तरुण पिढीला सक्षम करणे हा मुख्य उद्देश आहे.या शिबिरामध्ये महिलांना आवळ्या पासून घरच्या घरी १५ पेक्षा अधिक उत्पादने तयार करून त्यांची विक्री कशी करावी,याचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले.या प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये उत्साह निर्माण झाला असून उपस्थित महिलांनी समाधान व्यक्त केले.

या उपक्रमाचे आयोजन डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ,श्री समर्थ जन्मभूमी प्रतिष्ठान आणि समस्त ग्रामस्थ विराळ यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# संपादकीय

## साठवूया पाणी



वाढत्या लोकसंख्येला पुरेल इतके पाणी उपलब्ध करण्याचे आव्हान प्रशासनासमोर असतानाच, आता 'पाणी कपाती'च्या वादाने शहरात नवा पेच निर्माण केला आहे. याच पार्श्वभूमीवर पुण्याच्या पाणीटंचाईचा घेतलेला हा आढावा...

पुणे हे महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणारे शहर म्हणून ओळखले जाते. आयटी हब, शैक्षणिक केंद्र आणि औद्योगिक वाढ यामुळे पुण्याची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र या विकासासोबतच शहरासमोर एक गंभीर समस्या उभी राहिली आहे, ती म्हणजे दुष्काळ आणि पाणीटंचाई. दरवर्षी उन्हाळा सुरू होताच पुण्यातील अनेक भागांत पाण्याची कमतरता जाणवू लागते आणि नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. शेतीच्या भरण-पोषणापासून अर्थव्यवस्थेपर्यंत प्रत्येक घटकावर परिणाम करणाऱ्या मान्सूनच्या प्रवासात यंदा 'एल निनो'चे विघ्न येण्याची दाट चिन्हे आहेत. ही दुष्काळाची चाहूलच म्हटली पाहिजे. यंदा जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या मान्सून कालावधीत पाऊसमान कमीच राहणार असल्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज चिंता वाढवणारा आहे. या वर्षी नैऋत्य मोसमी पावसावर एल निनोचा प्रभाव राहणार असून, देशभर सरासरीच्या ९२ टक्के पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे.राज्यात अलीकडेच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर उद्भवलेली राजकीय परिस्थिती, तसेच सध्या बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने यंदाची 'कालवा समिती'ची बैठक लांबणीवर पडली आहे. परिणामी, पुणे शहर आणि ग्रामीण भागासाठीच्या पाणी वाटपाचे नियोजन रखडले आहे. या बैठकीत होणारा निर्णय हा शहर आणि शेती या दोघांच्याही हिताचा असतो. बैठक जेवढ्या लवकर होईल, तेवढ्या प्रभावीपणे उन्हाळ्यातील पाण्याचे नियोजन करता येते. बारामती पोटनिवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतरच ही बैठक होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत पुणे महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यातील पाणी कपातीचा वाद कसा मिटतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत खडकवासला प्रकल्पातील पाणीसाठा, बाष्पीभवन आणि शहराची वाढती मागणी यांचा विचार करून पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी निश्चित केले जाते. सध्या अधिकृत निर्णय झाला नसल्याने पुढील नियोजन विस्कळीत होण्याची शक्यता आहे.पुणे शहर आणि ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट गंभीर रूप धारण करत आहे. खडकवासला धरण परिसरातील चार धरणांमध्ये एकूण ४५ टक्के पाणीसाठा उरला आहे. खडकवासला (४३%), पानशेत (५६%), वरसगाव (४६%) आणि टेमघर (११.८८%) यांचा एकूण साठा सध्या सुमारे १४ टीएमसी आहे. गेल्या वर्षी याच तारखेला तो १२.९ टीएमसी होता. म्हणजे यंदा १.२ टीएमसी जास्त पाणी उपलब्ध असले, तरी शहराला दरमहा १.५ टीएमसी पाणी लागते आणि जुलैअखेरपर्यंत ७-८ टीएमसी लागणार आहे. शेतीसाठीही ४ टीएमसी अतिरिक्त पाणी सोडले जाते. शहरात पीएमसी आणि पीसीएमसी दोन्ही ठिकाणी पाण्याचा दाब कमी झाला असून कात्रज, कोंढवा, धायरी, वडगाव बुद्रुक, पाषाण, बावधन यांसारख्या उपनगरांत जानेवारीपासूनच टँकरची मागणी वाढली आहे.उष्णतेची लाट तीव्र होत असल्याने बाष्पीभवन आणि गळती मोठ्या प्रमाणात होत आहे. वाढती मागणी लक्षात घेता पाटबंधारे विभागाने १५ टक्के कपातीची विनंती केली होती, मात्र पालिकेतील सत्ताधाऱ्यांनी एक थेंबही कपात न करण्याची आक्रमक भूमिका घेतली आहे. या वादावर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पाणी कपातीचा निर्णय पालिकेनेच घ्यावा असे स्पष्ट केल्याने पेच वाढला आहे.ही समस्या योग्य नियोजन आणि उपाययोजनांद्वारे कमी करता येऊ शकते. शहरी भागात पावसाच्या पाण्याचे साठवण करणे, पाण्याचा पुनर्वापर करणे आणि पाइपलाइनमधील गळतीवर नियंत्रण मिळवणे अत्यंत आवश्यक आहे. हरित क्षेत्र वाढवणे हाही एक मार्ग आहे. ग्रामीण भागात जलसंधारण, नालेबांध, गाळ साठवण तलाव आणि शेतात तळे तयार करून पाणी साठवता येते. आधुनिक सिंचन पद्धती आणि पीक पद्धतीत बदल केल्यास पाण्याची बचत होईल. नागरिकांची भूमिका यात महत्त्वाची आहे. पाणी वाचवणे, अनावश्यक वापर टाळणे आणि गळती दुरुस्त करणे या सवयी अंगीकारल्यास परिस्थितीत सुधारणा होऊ शकते. शाळा आणि सामाजिक संस्थांनी जनजागृती करणे आवश्यक आहे. हवामान बदल हा दीर्घकालीन घटक असून भविष्यासाठी नवीन जलस्रोत विकसित करणे आणि जलव्यवस्थापन प्रभावी करणे गरजेचे आहे. एकूणच, पुण्यातील पाणीटंचाई ही नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांमुळे वाढलेली आहे. शासन, प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. योग्य नियोजन आणि जनजागृतीतूनच यावर नियंत्रण मिळवता येईल. 'जल है तो कल है' हे लक्षात घेऊन पाण्याची बचत हीच काळाची गरज आहे.

# देगलूर नगर परिषदेत 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिन' उत्साहात साजरा

## अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली कर्तव्यपूर्तीची शपथ

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर | प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि नागरिकांना पारदर्शक सेवा देण्याच्या उद्देशाने, आज दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी नगर परिषद देगलूर येथे 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नगर परिषदेच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नागरिकांना विहित वेळेत सेवा देण्याची सामूहिक शपथ घेतली.



माजी नगराध्यक्षा सौ. विजयमाला बालाजीराव टेकाळे तसेच मुख्याधिकारी श्रीमती निलम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. शासनाच्या सेवा पात्र नागरिकांपर्यंत विहित कालमर्यादेत, पारदर्शक पद्धतीने आणि सौजन्याने पोहोचाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता.

उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी, मी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पद्धतीने, विहित कालमर्यादेत व सौजन्याने पात्र नागरिकांना देण्याकामी मला सुपूर्द करण्यात आलेली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकतेने, निष्ठेने, सचोटीने, संवेदनशीलतेने व तत्परतेने पार पाडण्यासाठी कटिबद्ध राहीन. सेवा वितरण प्रक्रियेत कोणताही विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही याची काळजी घेईन, अशा शब्दांत आपल्या कर्तव्याची शपथ घेतली.

या प्रसंगी नगर परिषदेचे सर्व विभाग प्रमुख, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या हक्कांचे जतन करण्यासाठी आणि प्रशासकीय कामात अधिक गतिमानता आणण्यासाठी हा दिवस संकल्प दिन म्हणून पाळण्यात आला.

# सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्कावर कार्यशाळा संपन्न

**जळगाव | जितु इंगळे**

ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी व ज्ञानस्रोत केंद्राच्या संयुक्त विद्यमानाने बौद्धिक संपदा हक्क विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. एस. एन. वैष्णव (आय क्यु ए सी समन्वयक) यांनी केले. त्यात त्यांनी बौद्धिक संपदा हक्क याचे सद्यस्थितीतील महत्व तसेच त्याची व्याप्ती या विषयी माहिती दिली.

कार्यशाळेचे मुख्य वक्ते म्हणून महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विषयाचे प्रा. डॉ. सतीश ए. पाटील होते, त्यांचा परिचय प्रा. डॉ. जयंत पी. नेहेते यांनी करून दिला.

आपल्या व्याखानात प्रा. डॉ. सतीश ए. पाटील यांनी सर्वप्रथम सादरीकरणाच्या पहिल्या सत्रात बौद्धिक संपदे विषयी सर्वसाधारण माहिती दिली. दुसऱ्या सत्रात त्यांनी बौद्धिक संपदा आणि प्रत्यक्षात भारत सरकारच्या आयपीआरच्या पोर्टल वर आपले आयपीआर कसे नोंदणी करावी या बद्दल प्रात्यक्षिक द्वारे सादरीकरण केले. आयपीआर दाखल करतानाची संपूर्ण प्रक्रिया लागणारे सर्व दस्तऐवज या विषयी माहिती दिली.

कार्यशाळेचे समारोपात प्राचार्य डॉ जे. बी अंजने यांनी बौद्धिक संपदा हक्क या विषयाच्या कार्यशाळा आयोजनाबद्दलचे महत्व सांगितले तसेच या संबंधी असलेल्या शिखर संस्था व त्यांचा बौद्धिक संपदा हक्क या बद्दल असलेले कार्य या बद्दल विवेचन केले तसेच संशोधकांनी त्यांचे संशोधन कार्यकरून ते बौद्धिक संपदा हक्क प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने वाटचाल करावी असे प्रतिपादन केले. उपस्थितांचे आभार प्रा डॉ. एस. एस. साळुंके यांनी मानले. कार्यशाळेत मोठ्या संख्येने शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले. यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने, सचिव डॉ. एस. एन. वैष्णव, डॉ. एस. एस. साळुंके, प्रा. एच. एम. बाविस्कर, डॉ. जे. पी. नेहेते डॉ.एस. एस. साळुंके, श्रेयस पाटील, हर्षल पाटील आदिंनी प्रयत्न केले.



# 'मिशन भरारी' अंतर्गत गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या इस्त्रो अभ्यासदौऱ्यास उपमुख्यमंत्री यांच्याहस्ते हिरवा झेंडा

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई | प्रतिनिधी**

ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'मिशन भरारी' या अभिनव शैक्षणिक उपक्रमांतर्गत निवड झालेल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या इस्रो अभ्यासदौऱ्यास उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज, दि. २७ एप्रिल, २०२६ रोजी हिरवा झेंडा दाखविण्यात आला. हा शुभेच्छा समारंभ जिल्हा नियोजन भवन, ठाणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मिशन भरारी' हा केवळ उपक्रम नसून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारा एक व्यापक प्रयत्न आहे. आपल्या मातीतल्या लेकरांना आभाळाशी नाते जोडण्याची ही संधी आहे.






अल्पावधीत, केवळ तीन महिन्यांत हा उपक्रम प्रत्यक्षात उतरविणे हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे द्योतक आहे. पूर्वी सरकारी कामांना विलंब होत असल्याची धारणा होती; मात्र आज शासनाच्या कार्यपद्धतीत वेग आणि परिणामकारकता दिसून येते.ते पुढे म्हणाले, या स्पर्धेतून निवड झालेले ५९ विद्यार्थी हे माझ्या दृष्टीने 'सायन्स सोल्जर्स' आहेत. जसे सीमेवरील जवान देशाचे रक्षण करतात, तसे हे विद्यार्थी देशाचे वैज्ञानिक भविष्य घडवतील. विज्ञान म्हणजे केवळ माहिती नसून जिज्ञासा आणि प्रश्न विचारण्याची वृत्ती आहे. 'का?' हा प्रश्न विचारण्याची सवय जोपासा. हीच सवय तुम्हाला मोठ्या शोधांपर्यंत घेऊन जाईल.

ही सहल केवळ पर्यटन नसून प्रत्यक्ष विज्ञानाचा अनुभव देणारी आहे. विक्रम साराभाई अवकाश केंद्र, थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशन यांसारख्या ठिकाणी भेट देताना मिळणारा अनुभव तुमच्या आयुष्याला नवी दिशा देईल. शाळेतील ३६५ दिवसांच्या शिक्षणाइतकेच हे काही दिवस महत्त्वाचे ठरणार आहेत, असेही त्यांनी नमूद केले.तसेच, ग्रामीण भागात अपार क्षमता आहे. योग्य संधी आणि व्यासपीठ दिल्यास ही मुलेही आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेऊ शकतात. भविष्यात याच विद्यार्थ्यांमधून ए. पी. जे. अब्दुल कलाम किंवा कल्पना चावला यांच्यासारखे शास्त्रज्ञ घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि देशासाठी कार्य करण्याचे आवाहन करत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

# पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनची एकी कौतुकास्पद-डॉ.गिरीश गुणे

## डॉक्टरांचे जीवन कष्टमय-रामशेठ ठाकूर; शंभरावी सीएमई नव्या पर्वाची नांदी ठरेल-महेंद्रशेठ घरत

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई | प्रतिनिधी**

संघटनेच्या माध्यमातून सगळे एकत्र आल्याने सगळ्यांचा फायदा होतो. सामाजिक गरजांबरोबरच बौद्धिक गरजही सीएमईमार्फत भागविली जात आहे. वैद्यकीय ज्ञानाबरोबरच सामाजिक भान ठेवून काम करणे, ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. संघटनेच्या सभासदावर जर दुर्दैवी प्रसंग ओढवला तर त्याला संघटनेच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे आर्थिक सहकार्य केले जाते, ही बाजू जमेची आहे. त्यामुळे संघटनेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनची एकी ही कौतुकास्पद आहे, असे सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे म्हणाले. पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने नवी मुंबईतील ताज विवांता हाटेल येथे रविवारी (ता. २६) शंभरावी सीएमई आयोजित करण्यात आली होत्या. त्यावेळी डॉ. गुणे बोलत होते.या सीएमईचे उद्घाटन डॉ. गिरीश गुणे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत, पनवेलचे महापौर नितीन पाटील, माजी महापौर जे. एम. म्हात्रे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अपर्णा पवार, महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी आदींच्या उपस्थितीत झाले. यावेळी शेकडो डॉक्टर उपस्थित होते. यावेळी डॉ. वसंत पाटील यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



डॉक्टर मंडळी एकत्र येतायत, विचारांची देवाण-घेवाण करतायत आणि सामाजिक बांधिलकीही जपतायत. व्यवसाय करताना त्याला मनोरंजनाचीही जोड देतात, ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. डॉक्टरांचे जीवन कष्टमय असते. त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी असते. मी शिक्षकी पेशातून आलोय, त्यामुळे मला जाणीव आहे की आमच्यापेक्षा आपले जीवन खडतर आहे. डोळ्यांत तेल घालून काम करावे लागते. थोडीशी चूक डॉक्टरांना खूप महागात पडते. देशात वा राज्यात जेव्हा कठीण परिस्थिती उदभवते, तेव्हा डॉक्टरांचे योगदान निश्चतच वाखाणण्याजोगे असते. कोरोना काळात याची प्रचिती सर्वांना आलेली आहे, असे माजी खासदार रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना म्हणाले. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रातील देव म्हणून डॉक्टर गिरीश गुणे आणि सामाजिक क्षेत्रातील आधारवड माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या उपस्थितीने आजच्या सीएमईला चार चांद लागले आहेत. त्यांची उपस्थिती संघटनेच्या बळकटीकरणाला प्रोत्साहन देणारी आहे. त्यामुळे शंभरावी सीएमई नव्या पर्वाची नांदी ठरेल. जीवनाच्या रहाटगाड्यात, ताणतणावाच्या आयुष्यात आपल्यात असंख्य गुणही आहेत, ते आपण विसरून गेलो आहोत. पण खेळ व मनोरंजनाच्या माध्यमातून डॉक्टर्स मंडळी एकत्र येऊन आयुष्याचा आनंद घेत आहेत, हे निश्चितच उल्लेखनीय आहे. आयुष्य जगणे ही कला आहे. माणूस म्हणून जगताना कर्तव्य पार पाडून सामाजिक बांधिलकी जपणे, ही काळाची गरज आहे. आपल्या ताटातील भाकरी दुसऱ्याला देणे, यात खूप मोठे सुख दडलेले आहे.गेल्या वर्षी पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांना खंदेरी-उंदेरी या जलदुर्गावर जाण्याची संधी मिळाली, ती केवळ महेंद्रशेठ घरत यांच्यामुळेच! आम्हाला सुरक्षित नेणे-आणणे ही जबाबदारी महेंद्रशेठ घरत यांनी उत्तमप्रकारे पार पाडली. त्यावेळी आम्ही शिवरायांच्या जलदुर्गावर साफसफाईची मोहीम राबवली. या मोहिमेत आमची शंभर टक्के सुरक्षितता आणि काळजी महेंद्रशेठ घरत यांनी घेतली होती, अशा भावना पनवेल डॉक्टर जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केल्या. संघटनेचे अध्यक्ष डॉ. वैभव मोकल, डॉ. संदेश बहाडकर, डॉ. विवेक महाजन, डॉ. आशिष गांधी, डॉ. अमित दवे, डॉ. वैभव पाटील, डॉ. मिलिंद टिपणीस, डॉ. राजेंद्र पटेल, डॉ. दीपक केसरी, डॉ. शीतल सोमवंशी, डॉ. यशवंत भोईर, डॉ. भावेश ठक्कर, डॉ. महेश वाघमारे सर्व बोर्ड आणि कोर सदस्य यांनी शंभरावी सीएमई (वैद्यकीय शतकोत्सव)यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक;उष्णतेच्या लाटेबाबत जनजागृती करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

## संपर्क समन्वय योजना तयार करुन आपत्ती निवारणासाठी सज्ज राहण्याचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

आपत्ती व्यवस्थापनाचा मान्सूनपूर्व आढावा घेत असतांना सद्यस्थितीत येऊ घातलेल्या उष्णतेच्या लाटेचा प्रतिकार कसा करावा, याबाबत यंत्रणांनी जनजागृती करावी. आरोग्य विभागाने सर्वस्तरावरील आरोग्य संस्थांमध्ये शीत कक्ष उभारुन सज्जता ठेवावी,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिली. तसेच संपर्क व समन्वयाची योजना तयार ठेवून संभाव्य आपत्तीच्या निवारणासाठी सर्व विभागांनी सज्ज रहावे,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी आज सर्व यंत्रणांना दिले.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची आज मान्सून पूर्वतयारी आढावा बैठक पार पडली. जिल्हा नियोजन सभागृहात ही बैठक पार पडली. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या सह जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अति. पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी सामान्य शाखा संगिता राठोड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी



मारुती म्हस्के तसेच सर्व संबंधित यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात गोदावरी नदी काठावर निळ्या रेषेखाली येणारी पैठण तालुक्यात १८ तर वैजापूर तालुक्यात १७ व गंगापूर तालुक्यात ८ अशी एकूण ४३ गावे आहेत. पैठण तालुक्यात पैठण शहर, कावसान, दादेगाव- जहांगीर, नायगाव, वडवळी, नवगाव व वैजापूर तालुक्यातील डोणगाव, बाबतारा, लाखगंगा, नांदूरढोक, बाभूळगाव, बाजाठाण या गावांना पुरामुळे वेढा पडतो. तर जिल्ह्यात छत्रपती संभाजीनगर तालुक्यात १६, पैठण तालुक्यात १५, फुलंब्री तालुक्यात ७, वैजापूर तालुक्यात ३१, गंगापूर तालुक्यात २६, खुलताबाद तालुक्यात ६, सिल्लोड तालुक्यात १०, कन्नड तालुक्यात ४८ तर सोयगाव तालुक्यात ६ अशी एकूण १६५ गावे ही पूरप्रवण आहेत. जिल्ह्यात कायगाव ता. गंगापूर येथे छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर रस्ता व पैठण येथून शेवगाव कडे जाणारा रस्ता असे गोदावरी नदीवरील पुल पुराने बाधीत होतात. तसेच जिल्ह्यात एकूण ६३ लहान मोठे पूल आहेत. त्या पुलांची तपासणी करावी. पुरामुळे वा अन्य काही कारणामुळे पुलावरुन वाहतुक होणे शक्य नसल्यास पर्यायी वाहतुक मार्ग आत्ताच शोधून ठेवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.आपत्तीच्या प्रसंगी बचाव कार्यात मदत करण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे ५ बोटी, १९५ लाईफ जॅकेट्स, १६० लाईफ बॉय, २१५ बचाव साहित्य किट, ८१५ फोल्डींगचे स्ट्रेचर,८१५ बॉडी कव्हर बॅग्ज, १३२ सेफी हेल्मेट्स, १० रेस्क्यू क्राफ्ट्स, आपात्कालिन प्रकाश योजनेचे १७ संच, २७६ गम बुट जोडे, तात्पुरते उभारावयाचे २० तंबू, ५ दुर्बिणी असे साहित्य असून जिल्ह्यात ७९ ठिकाणी वीज अटकाव यंत्रणा बसविण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यातील २८ जणांनी स्कूबा डायव्हिंग तर २०९ जणांना आपदा मित्र म्हणून प्रशिक्षण देण्यात आले आहे. जिल्ह्यात १२ निवारा केंद्र आहेत.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, पुराचा धोका संभावणारी गावे, किंवा पुराच्या पाण्याने वेढली जाणारी गावांमध्ये जलशुद्धीकरणाची औषधी, साथरोगाची औषधे, अत्यावश्यक अन्नधान्य साठा इ. ची व्यवस्था करुन ठेवावी. तसेच जिल्ह्यातील पुलांचे, धरणांच्या बंधाऱ्यांची, लहान मोठ्या तलावांची माहिती अद्यावत करावी व देखभाल दुरुस्ती करुन घ्यावी. जिल्ह्याची सर्व विभागांची संपर्क व समन्वय व्यवस्था तयार करावी. प्रत्येक विभागाचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा येत्या १५ मे पर्यंत पुर्ण करावा. प्रत्येक विभागाचा २४७ नियंत्रण कक्ष तयार करुन कार्यान्वित करावा. सर्व ग्रामपातळीवरील अधिकाऱ्यांसह सर्व अधिकाऱ्यांनी मुख्यालयी थांबावे,असे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.

## जनगणना-२०२७ : १ मे पासून सुरू होणाऱ्या जनगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभागी व्हावे नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी




दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

देशाच्या नियोजनाचा मुख्य आधार असलेली 'जनगणना-२०२७' सुरू होत आहे.१ मे पासून सुरू होणाऱ्या जनगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.

जनगणना- २०२७ च्या अनुषंगाने परळी वैजनाथ येथे तीन दिवसाचे पहिल्या बॅचचे प्रशिक्षण डॉ. भालचंद्र वाचनालय या ठिकाणी घेण्यात आले. जनगणना प्रगणक, व पर्यवेक्षकांच्या या प्रशिक्षणाचा समारोप झाला. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रशिक्षणार्थी प्रगनक व पर्यवेक्षकांशी संवाद साधत त्यांनी जनगणना २०२७ मध्ये नागरिकांनी उस्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.यावेळी नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी संतोष रोडे यांच्यासह या प्रशिक्षणाचे प्रशिक्षक व जनगणना प्रगनक, पर्यवेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले की, जनगणना-२०२७'प्रक्रियेचा पहिला टप्पा म्हणून नागरिकांना १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वतःची माहिती स्वतः भरण्यासाठी 'स्व-गणना' हा विशेष पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. जनगणनेचे काम दोन टप्प्यांत होणार आहे. पहिल्या टप्प्यात 'मकान सूचीकरण आणि घरांची गणना' ही प्रक्रिया १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबवली जाणार आहे. डिजिटल इंडिया उपक्रमांतर्गत होणारी ही १६ वी जनगणना असून, नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.

# शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता?

### पुस्तक प्रकरणी आ.संजय गायकवाड यांच्या प्रतिमेला 'जोडे मारो' आंदोलन
### बागेश्वरधामचे धीरेंद्र शास्त्री यांच्या वक्तव्याचाही निषेध-डॉ. गणेश ढवळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या संदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप तसेच पुस्तक वितरक प्रशांत आंबी यांना शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे 'जोडे मारो' आंदोलन करण्यात आले. याचवेळी बागेश्वरधामचे धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांच्या संदर्भात केलेल्या कथित तथ्यहीन वक्तव्याचाही तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून पुस्तक न वाचताच आक्षेपार्ह उद्गार काढल्याचा आरोप बुलढाणा येथील आमदार संजय गायकवाड यांच्यावर करण्यात आला आहे. तसेच कोल्हापूर येथील पुस्तक वितरक प्रशांत आंबी यांना व त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करून घरात घुसून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला.

या प्रकरणी आमदार संजय गायकवाड यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा व अटक करावी, अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान, धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज लढून थकले होते व त्यांनी राज्यकारभार रामदास स्वामींकडे सोपविला, असे कथित वक्तव्य केल्यामुळे



शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले. या वक्तव्याचाही तीव्र निषेध करण्यात आला.शनिवार दि.२५ एप्रिल रोजी सकाळी लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलनकर्त्यांनी आ. संजय गायकवाड यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त केला. या वेळी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक, बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठविण्यात आले.

या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, विक्रांत वाणी, बाळकृष्ण थोरात, श्रीहरी निर्मळ, भगवान मोरे, रामचंद्र मुळे, सुरेश निर्मळ, सुरज कदम, संतोष भोसले, दादा गायकवाड, दिपक थोरात, गुलाब कांबळे, पप्पू निर्मळ, रावसाहेब निर्मळ, भालचंद्र कुदळे आदी शिवप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा सुधारणा कामांना मंजुरी; पाच जलकुंभांची होणार तातडीने दुरुस्ती

## नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांची माहिती

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

परळी शहरातील पाणीपुरवठा यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आणि जलकुंभांच्या दुरुस्तीसाठी १५ व्या वित्त आयोगांतर्गत (बंधनकारक अनुदान) ४५ लाख १९ हजार ८८३ रुपयांच्या विकासकामांना जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे शहरातील विविध भागातील पाणीपुरवठा जलकुंभ दुरुस्ती कामे तातडीने पूर्ण करण्याचा मार्ग सुलभ झाला आहे अशी माहिती नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी दिली आहे.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदे कडून सादर करण्यात आलेल्या पाणीपुरवठा सुधारणांच्या प्रस्तावास १५ व्या वित्त आयोगांतर्गत जिल्हाधिकाऱ्यांकडून मंजुरी मिळाली आहे. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार, 'बद्ध अनुदानातून' निधी पाणीपुरवठा आणि जलपुनर्भरण कामांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने या कामांना तांत्रिक मान्यता दिली होती, ज्यावर आता प्रशासकीय मंजुरीची मोहोर उमटली आहे. मंजूर करण्यात आलेल्या निधीतून शहरातील १. नगर परिषद कार्यालयाजवळील पाण्याची टाकी दुरुस्ती.,२. मोंढा परिसरातील पाण्याच्या टाकीची दुरुस्ती. ३. उड्डाणपूल परिसरातील पाण्याच्या टाकीची दुरुस्ती.,४. शिवाजीनगर थर्मल येथील पाण्याच्या टाकीची दुरुस्ती., ५. उड्डाणपूल परिसरातील दुसऱ्या जलकुंभाची दुरुस्ती अशी पाच जलकुंभांची दुरुस्ती तातडीने करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या मंजुरीमुळे परळी शहरातील अनेक जुन्या पाणी टाक्यांची दुरुस्ती होऊन पाणी गळती थांबण्यास आणि नागरिकांना नियमित पाणी मिळण्यास मदत होईल, असा विश्वास नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजाखान पठाण, पाणीपुरवठा सभापती सौ जयश्रीताई गीते, मुख्याधिकारी पी. एन. निगळ यांनी व्यक्त केला आहे.

नगरपरिषद परळी वैजनाथ
नगरहितं मम कर्तव्यम्
स्थापना १९५२

### पाच जलकुंभ दुरुस्तीची होणार परिपूर्ण कामे

दरम्यान या मंजूर लेखीतून परळी शहराच्या पाणीपुरवठासाठी मुख्य असलेल्या पाच जल कुंभांची परिपूर्ण दुरुस्तीची कामे हाती घेतली जाणार आहेत. यामध्ये जलकुंभामधील गाळ काढणे, आतून प्लास्टर, कलर ,नविन वॉल, फॅब्रिकेशनच्या शिडी भेगा भरणे व कॉंक्रीट दुरुस्ती, गंजलेले स्टील दुरुस्त करणे, छत/भिंतींचे मजबुतीकरण, जल कुंभार लिकेज थांबवण्या साठी केमिकल कोटिंग,आतील बाजूस फूड-ग्रेड वॉटरप्रूफिंग, क्लोरीनेशन करून निर्जंतुकीकरण, इनलेट/आउटलेट पाइप तपासणी,व्हॉल्व्ह, फ्लोट व्हॉल्व्ह बदलणे,बाहेरील रंगकाम सुरक्षा रेलिंग, जिने दुरुस्ती तसेच आवश्यक त्या सर्व दुरुस्त्या केला जाणार आहेत.

# आडस येथील योगेश्वरी मंगल कार्यालयात ॲड.आकाश आणि डॉ.रोहिणी यांचा विवाह सोहळा थाटात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लाडेवडगाव येथील लाड परिवाराचे चिरंजीव तथा अंबा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक केज वकील संघाचे अध्यक्ष ड.महादेवराव लाड आबा यांचे नातु व लक्ष्मीकांत लाड यांचे चिरंजीव अड.आकाश लाड व आणि आसोला ता.किल्ले धारूर येथील चोले परिवाराची सुकन्या चि.सौ.कां.डॉ.रोहिणी यांचा शुभविवाह सोहळा रविवार,दि.२६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.अंबाजोगाई रोड वरील योगेश्वरी मंगल कार्यालय आडस येथे हा विवाह सोहळा पार पडला.या सोहळयासाठी राजकीय,सामाजिक, विधी आणि वैद्यकीय,व अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नवदाम्पत्याला आशीर्वाद दिले.अड.आकाश हे विधी शाखेचे पदवीधर असून ते लाडे वडगाव येथील प्रतिष्ठित लाड परिवाराचे सदस्य आहेत. तर वधू रोहिणी या वैद्यकीय क्षेत्रातील पदवीधर असून धारूर तालुक्यातील आसोला येथील चोले परिवारातील आहेत.वकिली आणि वैद्यकीय अशा दोन महत्त्वाच्या क्षेत्रांतील उच्चशिक्षित वधू-वरांचा हा विवाह सोहळा परिसरात चर्चेचा विषय ठरला.

**विविध कार्यक्रमांची रेलचेल**

विवाहापूर्वी शनिवारी सायंकाळी 'हळदीचा समारंभ' उत्साहात पार पडला.रविवारी सायंकाळी ६ वाजून ४५ मिनिटांच्या शुभमुहूर्तावर मंगल वाद्यांच्या गजरात आणि मंगलमय वातावरणात वधुवर यांच्यावर शुभाशिर्वाद रुपी अक्षता पडल्या. यावेळी समस्त लाड परिवार आणि चोले परिवाराने आलेल्या पाहुण्यांचे उत्साहात स्वागत केले.या विवाह सोहळ्यानिमित्त दोन्ही कुटुंबातील नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.नांदा सौख्यभरे अशा शुभेच्छा देत उपस्थित मान्यवरांनी वधू-वरांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या मंगल सोहळ्याला न्यायाधीश श्री.सुरज केंद्रे,खा.बजरंग सोनवणे,मा.आ. पृथ्वीराज साठे,मा.आ. सौ.संगिताताई ठोंबरे, अंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन रमेश आडसकर,माजी चेअरमन अड.राजेसाहेब देशमुख,अंबाजोगाई चे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा,भाजपाचे संतोष हांगे,विष्णु भाऊ घुले, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कृष्णा अर्बन बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे,मुरली बप्पा ढाकणे. शिवसेना जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे,मनसे जिल्हाप्रमुख सुमंत धस,केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, गटनेते श्री.हारुणभाई इनामदार,डॉ.अशोक थोरात,अंबाजोगाई येथील नगरसेवक बबनराव लोमटे यांच्या सह राजकीय,शैक्षणिक सामाजिक,विधीज्ञ,कला, अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.सुरुची भोजनानंतर विवाह सोहळा उत्साहात संपन्न झाला.



## सोमवारी लोकशाही दिन

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक ४ मे २०२६ रोजी सकाळी १०-०० वाजता या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे, आपले सरकार व पी.जी.पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीच्या अंतिम अहवालासह वेळेवर उपस्थित राहावे.

## देवगाव येथील जेष्ठ नागरिक रामकिसन मुंडे यांचे वृद्धापकाळाने दुख:द निधन



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील देवगांव येथील रहिवासी जेष्ठ नागरिक रामकिसन पांडूरंग मुंडे वय ९० वर्षे यांचे दि.२८ एप्रिल रोजी मंगळवारी सकाळी वृध्दापकाळाने दुखःद निधन झाले.त्यांच्यावर मंगळवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. रामकिसन मुंडे यांच्या पश्चात दोन मुले,सुना, मुली,जावाई,नातवंडे अशा मोठा परिवार आहे. देवगांवचे माजी उप सरपंच विठ्ठल मुंडे व उद्योजक नितीन नागरगोजे यांचे ते आजोबा होत.त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरावर शोककळा पसरली आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची वैभव स्वामी यांनी घेतली सदिच्छा भेट; पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे दिले आमंत्रण

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

बीडच्या पालकमंत्री महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला उप मुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची देवगिरी या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन बारामती पोट निवडणुकी मध्ये ऐतिहासिक विजया साठी शुभेच्छा देवून दादांच्या स्वप्नातील विकसनशील बीड जिल्ह्याचे पालकत्व आपण पूर्ण करावे असे पत्रकारांच्या वतीने साकडे घातले.यावेळी दैनिक समर्थ राजयोगचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे आमंत्रण दिले.यावेळी



त्यांनी पत्रकार संघाच्या बीड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय मेळाव्याला उपस्थित राहण्याचा शब्द दिला आहे.

## एकुरका येथे अखंड हरिनाम सप्ताहा निमित्त शिवपुराण कथेला सुरुवात

### भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील एकुरका येथे अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त शिवपुराण कथा सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.सप्ताहाचे हे ३७ वे वर्ष असून ज्ञानेशभक्त, व्याकरणाचार्य ह.भ.प. अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या प्रेरणेने ही धार्मिक परंपरा अखंड पणे सुरू असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.




शुक्रवार,दि.२४ पासून सुरू झालेल्या या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता शुक्रवार,दि.१ मे रोजी होणार आहे. या कालावधीत दररोज काकडा,विष्णूसहस्त्र नाम,गाथा भजन, शिवपुराण कथा,हरिपाठ तसेच कीर्तन अशा विविध धार्मिक व सांप्रदायिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या शिवपुराण कथेसाठी ह.भ.प.प्रल्हाद महाराज शास्त्री हे कथा प्रवक्ते म्हणून उपस्थित असून,सप्ताहात सलग सात दिवस विविध मान्यवर कीर्तनकार व प्रवचनकारांचा सहभाग राहणार आहे.यामध्ये ह.भ.प.प्रभु महाराज मुंडे (गंगाखेडकर),जालना जिल्हा शिक्षण अधिकारी ह.भ.प.विक्रम महाराज सारूक,ह.भ.प.प्रल्हाद महाराज शास्त्री,ह.भ.प. विलास महाराज गेंगजे, ह.भ.प.सुदर्शन महाराज शास्त्री,ह.भ.प.प्रकाश महाराज साठे यांचा समावेश आहे.सप्ताहाची सांगता व्याकरणाचार्य ज्ञानेशभक्त ह.भ.प. अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.


तरी भावीक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## लोहा येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९५ व्या जयंतीनिमित्त आज भव्य मिरवणूकचे नियोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । प्रतिनिधी**

लोहा शहरात क्रांती सुर्य जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९५ व्या जयंतीनिमित्त आज भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी शिवा संघटनेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात लोहा तालुक्यातील तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. मनोहरजी धोंडे सर (संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष, शिवा संघटना)हे राहणार आहेत उद्घाटक म्हणून खासदार डॉ. शिवाजीराव काळगे (लातूर) यांची उपस्थित राहणार आहे. तसेच प्रमुख अतिथी म्हणून लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पाटील पवार, ॲडो,स्वप्नील व्हते (अहमदपूर न.पा.अध्यक्ष), करिम भाई शेख (उपनगराध्यक्ष, लोहा), मयुर सावकार नळदकर, नगरसेवक (न.पा.कंधार.सेवा



जनशक्ती पार्टी) दत्ताभाऊ खंकरे (राष्ट्रीय उपाध्यक्ष, शिवा संघटना), धन्यकुमार शिवणकर, वैजनाथ आण्णा तोनसुरे, विठ्ठल ताकबिडे, संजय कोठाळे, इंजि. अनिल माळगे तसेच माजी नगराध्यक्ष गजानन सावकार सूर्यवंशी उपस्थित राहणार आहेत. या जयंती मिरवणुकीसाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष अंकुश सोनवळे, स्वागताध्यक्ष सतीश आनेराव, शिवा संघटना लोहा तालुकाध्यक्ष रविराज होळगे, कार्याध्यक्ष मनोज शेलगावकर, विद्यार्थी आघाडीचे तालुकाध्यक्ष राजकुमार पिल्लोळे, कार्याध्यक्ष चंद्रकांत बेद्रे, शहराध्यक्ष सूर्यकांत आनेराव, सेवा जनशक्ती पार्टीचे तालुकाध्यक्ष गोविंद हाबगुंडे, उपाध्यक्ष साधु पाटील वडजे, गोविंद आनेराव, संदीप पिडगे, कल्याण वसमतकर आदींनी पुढाकार घेतला आहे.

ही भव्य मिरवणूक आज दुपारी ठीक ४ वाजता जुना लोहा येथील शिवमंदिरातून ढोलताशाच्या गजरात,तसेच शिव भजनी मंडळ यांच्या उपस्थितीत पाउल्या खेळत,गुरुच्या,महात्मा बसवेश्वर महाराज यांचा जयघोष करत निघणार असून मुख्य कार्यक्रम आलेल्या सर्व मान्यवरांनच्या भाषनानी व्यंकटेश मंगल कार्यालय येथे संपन्न होणार आहे. नागरिकांनी या जयंती सोहळ्यात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## खा.बजरंग सोनवणे यांच्या गाडीचा मस्साजोग येथे अपघात

### बजरंग सोनवणे सुखरूप

**कार्यकर्त्यांनी काळजी करू नये-खा.सोनवणे**

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

मंगळवार रोजी दुपारी बीड येथील नियोजित कार्यक्रम पूर्ण करून मस्साजोग येथील विवाह सोहळ्यास जात असताना,मस्साजोग येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी थांबलो असताना पाठीमागून आलेल्या एका तरुणाची दुचाकी माझ्या वाहनावर येऊन आदळली.सुदैवाने तो तरुणही पूर्णपणे सुरक्षित असून त्यालाही कोणतीही दुखापत झालेली नाही. परमेश्वराची कृपा आणि आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने या अपघातात मला तसेच माझ्यासोबत असलेल्या कोणत्याही सहकाऱ्याला कोणतीही दुखापत झालेली नाही.आम्ही सर्वजण पूर्णपणे सुखरूप आहोत.या घटनेमुळे आजचे नियोजित सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत.सध्या मी केज कडून पुण्याकडे प्रवास करत असून पूर्णपणे सुरक्षित आहे.त्यामुळे कुणीही काळजी करू नये.अपघाताची माहिती



मिळताच जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते, हितचिंतक आणि नागरिकांनी काळजी पोटी संपर्क साधून विचारपूस केली. आपल्या प्रेम,आपुलकी आणि आशीर्वादाबद्दल मी मनःपूर्वक कृतज्ञ आहे.काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. मी पूर्णपणे सुरक्षित असून लवकरच पुन्हा जनतेच्या सेवेत हजर राहीन खा.बजरंग मनोहरराव सोनवणे (खासदार,बीड लोकसभा मतदारसंघ) यांनी कळवले आहे.

## कु.प्रीती चव्हाण मंथन स्पर्धा परीक्षेत राज्यातून ७ क्र. तर बीड जिल्ह्यातून २ क्रमांकावर;ऊसतोड मजुराच्या मुलीचे घवघवीत यश

**दैनिक वादळ वार्ता**
**नाळवंडी । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कान्होबा तांडा या ठिकाणची इयत्ता १ शिकणाऱ्या कु. प्रीती गोरख चव्हाण या ऊसतोड कामगाराच्या मुलीने बाल गटातील मंथन स्पर्धा परीक्षेत मोठे घवघवीत असे यश संपादित केलेले आहे. यामध्ये या मुलीने राज्यातून ७ क्रमांकावर येण्याचा तर बीड जिल्ह्यातून दुसऱ्या क्रमांकावर येण्याचा मान पटकावलेला आहे तिला मिळालेल्या या यशाबद्दल तिचे तोंड भरून कौतुक केले जाऊ लागले आहे तर पंचक्रोशीतील नागरिकांकडून तिच्यावरती अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला आहे.कु. प्रीती चव्हाण या तोड कामगाराच्या मुलीने अवघ्या इयत्ता १ वर्गामध्ये शिकत असताना गगनचुंबी असे यश संपादित केलेले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कानोबा तांडा याठिकाणी ही विद्यार्थीनी शिक्षण घेत होती. यावेळी या विद्यार्थ्यांनी मंथन स्पर्धा परीक्षेमध्ये सहभाग नोंदवून राज्यातून ७ तर बीड जिल्ह्यातून २ क्रमांक पटकावलेला आहे या तिला मिळालेल्या अशाबद्दल तिचे कुटुंबियांकडून कौतुक होत आहे तर पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून तिचे अभिनंदन व्यक्त केले जाऊ लागले आहे.



## नायगाव बाजार येथे गोरक्ष सन्मान आव्हान अभियान

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगांव । हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगाव बाजार येथील हनुमान मंदिर येथे आज दिनांक २७ एप्रिल रोजी गो सन्मान आव्हान अभियानाला हनुमान मंदिरात आरती व गायची पूजा करून सुरुवात झाली. यावेळी नायगाव शहरातील गो भक्त व गो संत, गोमातेला राष्ट्रीय दर्जा मिळाला पाहिजे कत्तलखाने बंद झाले पाहिजेत गोमातेचे संरक्षण झालं पाहिजे यासाठी एकत्रीत येऊन तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी त्यांनी नागरिकांना आवाहन केलं भारतात गो वंश हत्या पूर्ण बंद झाली पाहिजे गाईला




राष्ट्रमाता, राष्ट्रीय देवी व गो सन्मान दिवस साजरा करण्यात यावा, गो माता व नंदीबाबा यांना मान सन्मान सेवा सुरक्षा मिळावी असा सन्मानित दर्जा देण्यात यावा, गो सेवेसाठी केंद्रीय कायदा बनवावा गोचर बोर्ड स्थापन करावे चारा सुरक्षा धोरण स्थापन करावे व गो आधारित शेती सुनिश्चित करावी व पंच गव्य उत्पादनांचे वितरण वाढवावे यासह अनेक मागण्या घेऊन त्यांनी तहसील येथे निवेदन देण्यात आले यावेळी नायगाव शहर तालुक्यातील अनेक गोसेवक साधुसंत गो भक्त, पत्रकार हनुमंत चंदनकर धर्मगुरु हरिओम गिरी बाबा, ताराबाई बापूराव बोमनाळे, नेहा कोडूकोटूलवार गंगाधर स्वामी अप्पा, प्रदीप देमेवार, प्रवीण शिंदे, गजानन बादवाड, पल्लवी वडजे, बळीराम वडजे, रघुनाथ सुगावे, बालाजी शिंदे व सर्व नायगाव तालुक्याती सहकारी गो भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077